निशाणी क्र.१ वरील आदेश
CNR No. MHLA02-005586-2021

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, मुद्रीकाबाई महालिंग बोमणे यांचा मृत्यू दिनांक ०४.०५.२०२१ रोजी अल्फा हॉस्पीटल, लातुर येथे झाला. अर्जदार क्र. १ हा मयतांचा मुलगा तर अर्जदार क्र. २ ही मुलगी आहे. मयतांचा आणखी एक मुलगा नामे संगमेश्वर महालिंगप्पा बोमणे याचा देखील मृत्यु दिनांक ०६.०६.२०२१ रोजी मुंबई येथे झाला. इतर वारस क्र. १ ही मयत संगमेश्वर याची विधवा पत्नी असून इतर वारस क्र. २ ही मुलगी व इतर वार क्र. ३ हा मुलगा आहे. अर्जदार व इतर वारस हे मयताचे वारस व उत्तराधिकारी असून त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताचे नावे एल.आय.सी. च्या पॉलीसी क्र. ९८५४९५९०४, ९८८७५४२९५, ९८८९५७६०८, ९८८९५७६०९, ९८८७५४१०८ या अनुक्रमे र.रु. १,००,०००/-, २,००,०००/-, ३,००,०००/-, २,००,०००/- व ५,००,०००/- जमा आहेत तर रिलायंन्स निपॉन पॉलीसी क्र. ५२७३९८७५ ही र.रु. १,०७,१६०/- जमा आहे. मयताच्या पश्चात् सदर रक्कम उत्तराधिकारी यांना मिळण्यासाठी त्यांना उत्तराधिकारी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदारांनी त्यांच्या नावे उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) निर्गमीत करण्याची विनंती केली.

०३. अर्जदारांनी हरकतींसंदर्भात लातूर येथे दिनांक १८.१०.२०२२ रोजी 'दैनिक एकमत' या वर्तमानपत्रात जाहीरनामा प्रसिध्द केला असून अर्जदारांच्या मागणीस कोणीही हरकत घेतलेली नाही.

०४. अर्जदार क्र. २ अर्चना विरभद्र पुणे हिने त्यांच्या मागणी पुष्टयर्थ स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. १० वर दाखल केले आहे. त्याचप्रमाणे कागदोपत्री पुरावा म्हणुन कागदपत्र यादी (नि.क्र. ४ खाली) मयत मुद्रीकाबाई महालिंग बोमणे यांचे मृत्यु

प्रमाणपत्र आणि एल.आय.सी. पॉलीसी ची प्रमाणपत्रे इत्यादी कागदपत्रांच्या छायांकित प्रती आणि 'दैनिक एकमत' या वर्तमानपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केलेले आहेत.

०५. प्रस्तुतचे प्रकरण मयत मुद्रीकाबाई महालिंग बोमने या मयत झाल्या असल्याने अर्जदार व इतर वारस हे त्यांचे उत्तराधिकारी असून त्यांना मयतांचे नावे असलेल्या सर्व रकमा मिळणेकरिता उत्तराधिकारी प्रमाणपत्रची आवश्यकता आहे, करिता दाखल केले आहे.

०६. अर्जदारांचा तोंडी पुरावा व अभिलेखावरील कागदपत्रांवरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, मयत मुद्रीकाबाई महालिंग बोमने यांना अर्जदार व इतर वारस हेच वारस आहेत. तसेच अर्जदारांच्या मागणीस कोणीही हरकत घेतली नाही. मयताचे नांवे पुढील रकान्यात नमुद केल्याप्रमाणे रक्कम आहे. सबब, माझ्या मते अर्जदार व इतर वारस हे ती रक्कम मिळण्यासाठी, उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळण्यास पात्र आहेत.

| | **विवरण** | **क्रमांक** | **रक्कम रुपये** |
|---|---|---|---|
| १. | एल.आय.सी. पॉलीसी | ९८५४९५९०४ | १,००,०००/- |
| २. | एल.आय.सी. पॉलीसी | ९८८७५४२९५ | २,००,०००/- |
| ३. | एल.आय.सी. पॉलीसी | ९८८९५७६०८ | ३,००,०००/- |
| ४. | एल.आय.सी. पॉलीसी | ९८८९५७६०९ | २,००,०००/- |
| ५. | एल.आय.सी. पॉलीसी | ९८८७५४१०८ | ५,००,०००/- |
| ६. | रिलायंन्स निपॉन पॉलीसी | ५२७३९८७५ | १,०७,१६०/- |

करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्जदार क्र. १ व २ नामे अमोल महालिंग बोमने, अर्चना विरभद्र पुने तसेच इतर वारस क्र. १ ते ३ नामे पुजा संगमेश्वर बोमने, समृध्दी संगमेश्वर बोमने

व सुधनवा संगमेश्वर बोमने हे मयत महालिंग इराप्पा बोमणे यांचे कायदेशीर वारस असल्याने, रकान्यातील नमुद एकुण रकमेवर न्यायालयीन शुल्क दिल्यानंतर त्यांच्या नावे उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) निर्गमित करण्यात यावे.

२. अर्जदार क्र. २ ने बंधपत्र सादर करावे.

३. येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

Digitally signed by NANASAHEB R TALEKAR Date: 2023.01.18 17:38:07 -0500

**(एन.आर. तळेकर)**

**दिनांक १८/०१/२०२३** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, लातूर.**